# घोडावत विद्यापीठाला आयएसओ प्रमाणपत्र

## दुहेरी प्रमाणपत्र मिळविणारे भारतातील पहिले विद्यापीठ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संजय घोडावत विद्यापीठास आयएसओ ९००१:२०१५ आणि आयएसओ २१००१:२०१८ मानांकनाचे प्रमाणपत्र देण्यात आले. अशा प्रकारचे दुहेरी यश मिळविणारे संजय घोडावत विद्यापीठ हे भारतातील पहिलेच विद्यापीठ आहे

संजय घोडावत विद्यापीठ सातत्याने शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम हाती घेत असते. यासाठी संजय घोडावत विद्यापीठात एज्युकेशनल ऑर्गनायझेशन मॅनेजमेंट प्रणालीची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या प्रणालीचे नुकतेच इंटरनॅशनल अक्रेडीटेशन फोरम, इंटरनॅशनल अक्रेडीटेशन सर्व्हीसेस, अमेरिका मान्यताप्राप्त सर्टिफिकेशन संस्था इंटरसर्टकडून परिक्षण करण्यात आले.

यासाठी त्यांना आयएसओचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक राहुल मेंच यांनी मार्गदर्शन केले. यात संजय घोडावत विद्यापीठात गुणवत्ता वाढीसाठी आयएसओ ९००१:२०१५ व आयएसओ २१००१:२०१८ मानांकनाप्रमाणे कशा पद्धतीने काम केले पाहिजे आणि त्याचे ऑडीट कसे केले पाहिजे यासाठी प्रशिक्षण देण्यात आले.




कुलगुरू डॉ. व्ही. ए. रायकर म्हणाले, ही दोन्ही मानांकने आंतरराष्ट्रीय स्तरावरील आहेत. एकाचवेळी ही मानांकने मिळवून भारतातील पहिले विद्यापीठ होण्याचा बहुमान संजय घोडावत विद्यापीठाला प्राप्त झाला ही अभिमानास्पद बाब आहे. या मानांकनासाठी प्रा.भाग्यश्री केळकर व सर्व टीमने घेतलेल्या अथक परिश्रमाबद्दल त्यांचे कौतुक आहे. या मानांकनामुळे विद्यापीठाची गुणवत्ता व दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे.

विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत, विश्वस्त विनायक भोसले, कुलगुरू डॉ. व्ही.ए. रायकर, कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर व अकॅडमिक डीन डॉ. एम. टी. तेलसंग यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापन प्रतिनिधी प्रा. भाग्यश्री केळकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.